# पर्यावरण संरक्षण कायदा - एक आढावा

**प्रा. डॉ. रंजीता डी जाधव**
गोदावरी महाविद्यालय अंबड
ता. अंबड जि. जालना

---

**गोषवारा:**

पर्यावरण संरक्षणाची कल्पना ही प्राचीन काळापासून भारतीय सांस्कृतिक तसेच आचार विचारांमध्ये रुजलेली आढळते. नैसर्गिक संसाधनाच्या संवर्धनासाठी सध्याच्या कायदेशीर तरतुदी समजून घेणे आवश्यक आहे. 1972 च्या स्टॉक होम घोषणाने भारत सरकारचे लक्ष पर्यावरण संरक्षणाच्या व्यापक दृष्टिकोनाकडे वळले व त्यातून 1986 मध्ये पर्यावरण संरक्षण कायदा संमत करण्यात आला. या कायद्यानुसार पर्यावरणाचे संवर्धन करून, नागरिकांना प्रदूषण मुक्त पर्यावरण देणे हे महत्त्वाचे आहे. हा कायदा पर्यावरणाचे संरक्षण आणि सुधारणा प्रदान करण्याच्या उद्देशाने लागू करण्यात आला. हा कायदा आपल्या कायद्यापैकी सगळ्यात महत्त्वाचा. हा कायदा पर्यावरणीय प्रदूषण रोखण्यासाठी आणि देशाच्या विविध भागांमध्ये असलेल्या विशिष्ट पर्यावरणीय समस्यांना सामोरे जाण्यासाठी केंद्र सरकारला प्राधिकरण स्थापन करण्याचा अधिकार देते. हा कायदा पर्यावरणाचे संरक्षण आणि सुधारणेसाठी असलेला सर्वात व्यापक कायदा आहे. या कायद्यामुळे प्रदूषण करणाऱ्या कारखान्याला व व्यक्तीला दंडात्मक व कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागते, यात कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्ती व संस्थावर प्रदूषण मंडळ द्वारे कारवाई करण्यात येते.

**key words**

प्रदूषण, अनुबंधित, पार्श्वभूमी, पर्यावरण विश्व, शिक्षा व दंड.

---

**प्रस्तावना:**

सजीव प्राण्याची या पृथ्वीतलावर निर्मिती झाली, तेव्हापासून ते आजतागायत सजीव प्राण्यांच्या सभोवतालची परिस्थिती म्हणजे पर्यावरण असा पर्यावरणाचा अर्थ घेतल्या जातो. अनादी कालापासून मानव आणि पर्यावरण यांचा परस्पर संबंध आहे. भौगोलिक आपत्तीमुळे निसर्गातील पर्यावरणात वेळोवेळी असंतुलन निर्माण झाले, परंतु या असंतुलित पर्यावरणीय घटकाला संतुलित ठेवण्याची क्षमता निसर्गात निसर्गतः असल्याने पर्यावरणाचे संतुलन राखले गेले. मानवी जीवन सुसह्य राहण्यासाठी निकोप आणि सुंदर पर्यावरणाची नितांत आवश्यकता आहे हे आता सर्वज्ञात आहे.

पर्यावरण हे मानव, प्राणी आणि सजीवांना वाढण्यास आणि विकसित होण्यास मदत करते. मानव हा देखील पर्यावरणाचा एक महत्त्वाचा भाग आहे. पर्यावरणाचा घटक असल्याने मानवाने पर्यावरणाचे संवर्धन केले पाहिजे.आपले हे जीवन सुखकर करण्यासाठी व ते टिकविण्यासाठी आपल्याला पर्यावरणाचे वास्तव जपावे लागेल. थोडक्यात, पर्यावरण व मानव यांचे अतूट नाते आहे. मानवाबरोबरच सर्व सजीव सृष्टी पर्यावरणाशी यानात्या नात्याने अनुबंधित झालेली आहे. निसर्गातील हवा, पाणी, वृक्ष, वनस्पती, जमीन, पशुपक्षी आणि मानव प्राणी यांच्या पारस्पारिक नात्यात जेव्हा नैसर्गिक समतोल असतो तेव्हा पर्यावरण संतुलित आहे असे म्हणतात.

कोणताही प्रदेशातील पर्यावरण हा सजीवांसाठी साधनसामग्रीचा अनमोल ठेवा असतो, या ठेव्याचा वारसाहक्क व जतन ही सर्वस्वी मानवी पिढ्यांची अनुषंगिक जबाबदारी आहे. आजच्या युगात पर्यावरण प्रदूषण झपाट्याने वाढत आहे, वाढत्या पर्यावरणाचा ऱ्हास हा मानवी जीवनासाठी घातक आहे, त्यामुळे पर्यावरणाचे संरक्षण करणे अत्यंत आवश्यक आहे व ती जबाबदारी केवळ कायद्याने घेतली जाणार नाही, तर प्रत्येकाने पर्यावरणाच्या विश्वात राहूनच कार्य केले पाहिजे, तरच पर्यावरणाचे संरक्षण होईल व त्यासंदर्भात 1986 मध्ये पर्यावरण संरक्षण कायदा संमत करण्यात आला.

**उद्दिष्टे :**

- पर्यावरण संरक्षण कायद्याचे स्वरूप व उद्दिष्टे स्पष्ट करणे.
- केंद्रीय पर्यावरण संरक्षण मंडळाची रचना व कार्याचे ज्ञान मिळविणे.
- संरक्षण कायद्यातील शिक्षा व दंड इत्यादी तरतुदीचा आढावा घेणे.
- पर्यावरण संरक्षण कायद्याचे महत्त्व प्रतिपादन करणे.

**संशोधन पद्धती :**

सदरील शोधनिबंध हा दुय्यम साधनसामग्री वर आधारित असून यामध्ये शासनाचे विविध अहवाल, पर्यावरण व व्यवस्थापन संवर्धन इत्यादी वरील ग्रंथ, विविध वर्तमानपत्रातील लेख इत्यादीचा आधार स्वरूपाचे विश्लेषण केले आहे.

**विषय मांडणी :**

लोकसंख्या वाढ ही पर्यावरण प्रदूषण वाढण्यास कारणीभूत आहे. आपली पृथ्वी मानवाच्या गरजा भागू शकते, परंतु मानवाचा हवाच मात्र पुरवू शकत नाही. मानव हा इतर प्राण्यांपेक्षा वेगळा ठरतो तो त्याच्या बुद्धीमुळे, परंतु मानवाने बुद्धीचा उपयोग करण्यापेक्षा दुरुपयोग जास्त केल्यामुळे निसर्गाचे चक्र बिघडण्यास मानव हाच कारणीभूत आहे. निसर्गचक्र बिघडण्याचा फटका सर्व प्राणी, जीवमात्रांना बसतो आहे.

मानवाने वेळीच दखल घेतली तर मानवाबरोबरच, इतर प्राणी, पक्षी, वनस्पती जिवंत राहू शकतील नसता, पृथ्वीवर सजीव आढळणार नाही, याकरिता पर्यावरण प्रदूषण रोखणे अत्यंत आवश्यक आहे आणि त्यासाठी 1986 पर्यावरण संरक्षण कायदा अंमलात आणला गेला, जेणेकरून पर्यावरण प्रदूषण रोखण्यास मदत होईल. भारत सरकारद्वारे पर्यावरण प्रदूषण नियंत्रण कायदा 1986 साली अंमलात आणला, या कायद्याद्वारे पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन यावर भर दिलेला आहे, या कायद्यामध्ये पर्यावरणाचे संरक्षण करणे, त्याचा दर्जा सुधारणे व पर्यावरण प्रदूषणास प्रतिबंध करणे, त्याचे नियंत्रण करणे यावर भर दिला आहे.

**पर्यावरण संरक्षण कायद्याचे स्वरूप :**

1986 साली भारतात आलेला पर्यावरण संरक्षण कायदा वेगवेगळ्या तरतुदीद्वारे बळकट करण्यात आला. मानवी कृतीमुळे पर्यावरणाची घटलेली गुणवत्ता वाढविणे व पर्यावरणाची स्थिती सुधारणे हा उद्देश समोर ठेवून हा कायदा करण्यात आला आहे. पर्यावरण संरक्षण अधिनियम कायदा 23 मे 1986 ला संमत करण्यात आला, व 19 नोव्हेंबर 1986 पासून लागू करण्यात आला. मानव जंगले इत्यादीचे पर्यावरणीय संरक्षण आणि संकटापासून रक्षण करण्याच्या हेतूने कायदेशीर तरतुदी करण्यासाठी आणि पर्यावरण संरक्षण प्राधिकरण निर्मिती आणि त्यांच्या कार्यात समन्वय निर्माण करण्याच्या उद्देशाने हा कायदा संमत करण्यात आला. हा कायदा एकूण चार विभागात आणि 26 कलमांमध्ये विशद केलेला आहे. या कायद्याच्या पाठीमागे फार मोठी पार्श्वभूमीआहे. 5 जून 1972 रोजी संयुक्त राष्ट्र संघटनेने स्टॉकहोम येथे मानव पर्यावरण परिषद आयोजित केली होती, या परिषदेत भारताने देखील भाग घेतला होता. या परिषदे ने पर्यावरण संरक्षणाबद्दल कार्य करण्यासाठी सदस्य राष्ट्रांनी पावले उचलावीत असे आवाहन केले होते. या परिषदेच्या प्रभावाने भारत सरकारने हा कायदा केला. घटनेच्या 48(A)नुसार राज्य पर्यावरणाचे संरक्षण आणि सुधारणा तसेच देशातील जंगले आणि वन्यजीवांचे संरक्षण करण्यासाठी प्रयत्न करेल.

हा कायदा एकूण चार विभाग आणि 26 कलमांमध्ये विशद केलेला आहे. कलम 51 (A) नुसार प्रत्येक नागरिक पर्यावरणाचे रक्षण करेल. घटनेतील वरील कायदेशीर तरतुदीमुळे पर्यावरण संरक्षण कायदा संमत करण्याच्या प्रक्रियेला बळ मिळाले.

**पर्यावरण संरक्षण कायद्यातील तरतुदी :**

- कलम 1 नुसार हा कायदा संपूर्ण भारतासाठी लागू असेल.
- कलम 2 मध्ये पर्यावरण, पर्यावरणीय प्रदूषण, घातक वस्तू, व्यापार इत्यादीच्या व्याख्या दिल्या आहे.
- कलम 3 मध्ये पर्यावरण प्रदूषण, पर्यावरणीय सुधारणा व कृती कार्यक्रमाचे अंमलबजावणी करण्याचा आणि पर्यावरणीय गुणवत्ता टिकविण्यासाठी मापदंड निश्चित करण्याचा अधिकार सरकारला दिलेला आहे.

- कलम 4 ते 6 मध्ये पर्यावरण संरक्षणासाठी नेमलेल्या अधिकाऱ्यांचे अधिकार व जबाबदारी यांचे वर्णन आहे.
- कलम 8 ते 17 मध्ये पर्यावरण प्रदूषण प्रतिबंध, नियंत्रण आणि सुधारणा विषयक तरतुदी आहेत.
- कलम 18 ते 26 मध्ये पर्यावरणाच्या संबंधातील गुन्हा दाखल करण्यासंबधी तरतूदी दिलेल्या आहे.

**पर्यावरण संरक्षण कायद्याची वैशिष्ट्ये :**

- या कायद्याने केंद्र सरकारला पर्यावरण संरक्षण व सुधारणा करण्याच्या हेतूने आवश्यक उपाययोजना करण्याच्या अधिकार दिलेला आहे.
- पर्यावरण प्रदूषण, प्रतिबंध आणि नियंत्रणाबाबत देशव्यापी कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याचा अधिकार केंद्र सरकारला दिलेला आहे.
- पर्यावरण संरक्षण आणि व्यवस्थापना साठी केंद्रीय पातळीवर रचनात्मक यंत्रणेची उभारणी करण्याचा अधिकार केंद्राला दिलेला आहे.
- पर्यावरण संरक्षणासाठी नियमावली तयार करण्याचा अधिकार केंद्र सरकारला दिलेला आहे.
- पर्यावरण संरक्षणाशी संबंधित नियम व कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्ती किंवा संस्थेस शिक्षा देण्याचा अधिकार शासनाला दिलेला आहे.
- पर्यावरणासाठी धोकेदायक ठरणाऱ्या उद्योगांचे परीक्षण करण्याचा अधिकार शासनाला दिलेला आहे.
- पर्यावरणीय प्रदूषणाबाबत मानके निश्चित करण्याचा अधिकार सरकारला या कायद्याने दिला आहे.
- पर्यावरणीय प्रयोगशाळा उभारणे,पर्यावरण सुधारण्यासाठी संशोधनाची जबाबदारी प्रयोगशाळेकडे सोपविण्यात आली आहे.
- पर्यावरणा संदर्भातील माहिती जमा करण्याची जबाबदारी त्यांच्याकडे सोपवण्यात आली आहे.
- सजीव प्राणी, वनस्पती आणि इतर साधन संपत्ती रक्षणासाठीच्या तरतुदी करण्याचा अधिकार शासनाला दिलेला आहे.

**रचना :**

या कायद्यातील तरतुदीनुसार केंद्र व राज्य पर्यावरण प्रदूषण नियंत्रण मंडळे निर्माण करण्यात आली आहे. यानुसार पर्यावरण संवर्धनात व संरक्षणास स्थानिक यंत्रणेच्या व जनतेच्या जनसहभागाचे महत्त्व लक्षात घेऊन केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने देशातील प्रत्येक राज्यात प्रदूषण नियंत्रण मंडळा व्यतिरिक्त जिल्हा पातळीवर जिल्हा पर्यावरण समिती गठित करण्याबाबत निर्देश त्यांच्या 30. 12 .1988 च्या पत्राद्वारे दिलेले आहे, ही समिती कठीत करण्यामागील केंद्र शासनाचा मुख्य हेतू हा, जिल्ह्यातील पर्यावरणाचे संरक्षण करणे असा आहे. ही समिती स्थानिक पर्यावरणाशी संबंधित बाबीवर लक्ष केंद्रित करते. जनसहभागाने स्थानिक पर्यावरणाशी संबंधित बाबीवर लक्ष केंद्रित करते, जनसहभागाने स्थानिक पर्यावरणाच्या समस्या जाणून घेऊन त्यावर उपाययोजना सुचविते, जनजागृती करते, जिल्ह्यातील विविध नैसर्गिक संसाधन संवर्धनासाठी शासनाकडे शिफारशी करते, तसेच शासनाला सल्ला देणे अशी पर्यावरण संवर्धनासाठी कार्य देखील करते.

**कार्य** :

केंद्रीय पर्यावरण संरक्षण मंडळाचे कार्य दोन पातळीवर आधारित आहे, . केंद्रीय पर्यावरण संरक्षण मंडळाचे राष्ट्रीय पातळीवरील कार्य, राज्य मंडळाचे राज्य पातळीवर व केंद्रशासित प्रदेशाचे प्रदेश पातळीवर कार्य.

- मार्गदर्शन - सरकारला पर्यावरण प्रदूषण नियंत्रण आणि पर्यावरण गुणवत्तेची काळजी घेण्यासंदर्भात मार्गदर्शन करणे.
- राज्य व केंद्रशासित प्रदेशांमधील वाद- तंटा मिटविणे त्यांना तांत्रिक सहाय्य करणे.
- लोकशिक्षण व प्रशिक्षण - पर्यावरणीय प्रदूषण नियंत्रणासाठी व्यक्तींना प्रशिक्षण देणे, पर्यावरण संरक्षण संदर्भात जागृती करणे.
- संशोधन व सर्वेक्षण - पर्यावरणीय संदर्भात संशोधन करुन पर्यावरण संरक्षण करणे.

- प्रदूषण करणाऱ्या उद्योगधंद्याचे अथवा कारखान्याची वेळीच दखल घेणे त्यातून बाहेर पडणाऱ्या पाण्याचे व विद्राव्य पदार्थांचे तसेच विषारी वायूचे नमुने गोळा करणे.
- पर्यावरण प्रदूषण नियंत्रणा संदर्भात प्रमाणित कक्षा ठरविणे.
- जलसाठ्यामध्ये दूषित पाणी अथवा विषारी घटक सोडण्यास प्रतिबंध करणे.
- जल प्रदूषण व वायू प्रदूषण करणाऱ्या कारखान्यावर दंडात्मक कारवाई करणे.

राज्य अथवा केंद्रशासित प्रदेशातील केंद्र अथवा इतर राज्यांना सुसंगत होतील अशी कार्य करणे आवश्यक आहे, यामध्ये स्थानिक लोकांना मार्गदर्शन करणे, जनजागृती घडून आणणे देखील आवश्यक आहे.

**पर्यावरण संरक्षण कायदा 1986 नुसार करण्यात येणारी कायदेशीर कारवाई :**

या कायद्यामुळे प्रदूषण करणाऱ्या कारखान्याला दंडात्मक व कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागते. यात कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्ती व संस्थावर राज्य प्रदूषण मंडळाद्वारे कारवाई करण्यात येते. दोषी संस्था अथवा व्यक्तींना तीन महिने कारावास व दहा हजार रुपयापर्यंत दंड अशी शिक्षा दिल्या जाऊ शकते, जर गुन्ह्याची पुनरावृत्ती झाल्यास दर दिवशी 5000 रुपये दंडाचे शिक्षा होऊ शकते, तर गुन्हा करणारी व्यक्ती परत आढळल्यास परत गुन्हा करण्याच्या आरोपाखाली दोन ते सात वर्षे तुरुंगवास व दंड अशी शिक्षा सुनावली जाऊ शकते.

पर्यावरण संरक्षण कायदा 1986 व त्या अंतर्गत पारित करण्यात आलेल्या विविध नियमांचे, जारी करण्यात आलेल्या आदेशांचे उल्लंघन करीत असेल तर त्यास सदर कायद्याच्या कलम 15 अन्वये मे. मुख्य न्यायदंडाधिकारी व मे. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग 5 वर्षापर्यंतचा कारावास व दंड जो रुपये पाच लाखापर्यंत वाढवू शकतात किंवा दोन्ही आकारू शकतात.

**समारोप:**

**पर्यावरण संरक्षण कायद्याचे महत्त्व :**

पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी हा कायदा महत्वपूर्ण आहे, या कायद्याद्वारे पर्यावरणाचा दर्जा राखला जात आहे. प्रदूषण नियंत्रणा द्वारे पर्यावरणाच्या गुणवत्तेचे रक्षण होत आहे. हा कायदा प्रदूषण रोखण्याबरोबरच ते होऊ नये अशी दुहेरी भूमिका बजावत आहे, तसेच या कायद्याने पर्यावरण आणि प्रदूषणाची निगडित संकल्पनेची परिभाषा दिल्यामुळे त्याचा अर्थ लावणे सोयीस्कर झालेले आहे. या कायद्यामुळे प्रदूषण कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांसाठी कठोर शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. प्रदूषणकारी उद्योग बंद करण्याचा अधिकार सरकारला मिळाला आहे. या कायद्याद्वारे पर्यावरणीय गुणवत्ता सुधारण्यासाठी योग्य ती पावले उचलली जात आहे.

तसेच, या पर्यावरण संरक्षण कायद्यामध्ये काही उणीवा किंवा दोष देखील आहेत, जसे की हा कायदा पर्यावरण संरक्षणाबद्दल केंद्र सरकारला व्यापक अधिकार देतो आणि राज्याच्या अधिकाऱ्याकडे दुर्लक्ष करतो. उद्योग स्थापन करण्यापूर्वी पर्यावरणीय प्रभावांचे मूल्यांकन करण्याची तरतूद कायद्यात नाही. एकंदरीत पर्यावरण संरक्षणासाठी हा कायदा महत्त्वपूर्ण वाटतो. मात्र अंमलबजावणीच्या बाबतीत म्हणावा तसा परिणामकारक आढळत नाही. आजही प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष कारणामुळे व्यक्ती व समाज पर्यावरण प्रदूषणासाठी कारणीभूत आहे व त्यासाठी कायद्याच्या कडक अंमलबजावणी बरोबरच लोकशिक्षण व जनजागृतीची नितांत आवश्यकता आहे.

**संदर्भ ग्रंथ :**


- घारपुरे विठ्ठल 2004) पर्यावरण शास्त्र- पिंपळापुरे अँड पब्लिशर्स महाल नागपूर
- अहिरराव वा. र. (1999) पर्यावरण विज्ञान- निराली प्रकाशन, पुणे
- पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, 1986 (सन 1986 चा अधिनियम क्रमांक 29)
- पर्यावरण संरक्षण अधिनियम 1986 चे ऐतिहासिक पार्श्वभूमी व वैशिष्ट्ये
- www.drishiias.com